E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# “संत साहित्य आणि मानसशास्त्र”

**प्रा. डॉ. रामकिसन बेलनुर**
**सहा. प्राध्यापक मानसशास्त्र विभाग,**
**मत्स्योदरी कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अंबड.**
**मो. नं. 9420403404**

**गोषवारा:**

मानवाच्या संदर्भात अभ्यास करताना संत साहित्याचा मानसशास्त्रीय संबंध अभ्यासण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील एकूण संत साहित्याचा विचार करण्यात आला आहे. मानसशास्त्र हे वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र असल्याने, संत साहित्याचा मानवी वर्तनासंदर्भात केलेले विवेचन यामध्ये करण्यात आले आहे. अभ्यास पध्दतीमध्ये द्वितीय संसाधनांचा वापर करण्यात आला आहे. संत साहित्यामध्ये मानवी मनाचा अभ्यास करण्यात आलेला दिसून येते, तो हा अभ्यास विषय मानसशास्त्र विषयाचा देखील आहे. थोडक्यात सदरील संशोधनात असे दिसून आले आहे की, संत साहित्य आणि मानसशास्त्र यांचा जवळचा संबंध आहे. संत साहित्य आणि मानसशास्त्र यांच्या तील दृष्टीकोणात साम्य दिसून येते.

**शब्द सुची:-** संत, संत साहित्य, मन, विचार, मानसशास्त्र

## प्रास्ताविक:-

महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते, कारण महाराष्ट्रात संताची खूप मोठी परंपरा देखील आहे. संत साहित्याचा इतिहास 12 व्या शतकापसून दिसून येते. यालाच वारकरी संप्रदाय तसेच भागवत धर्म असे देखील म्हणतात. यामध्ये संत ज्ञानेश्वर (ज्ञानेश्वरी), संत नामदेव (अभंग), संत एकनाथ (भागवत), संत तुकाराम (गाथा), संत रामदास (दासबोध), संत बहिणाबाई (तत्वज्ञान), संत जनाबाई (समाज सुधारक विचार) आदी संताचा विचार करावा लागतो. इ.सन 12 ते 18 व्या शतकापर्यंत कालखंडाचा विचार करण्यात आला आहे. या काळात हे साहित्य केवळ धार्मिक साहित्य म्हणून वापरले जात नव्हते तर प्रभावी समाज प्रबोधनाचे काम देखील केले आहे. या संत मंडळीच्या साहित्यामध्ये मानवता, विश्वबंधूता, समता, ममता, नीतीमूल्यांची शिकवण देणारी माहिती आहे.

समाजातील सर्व सामान्य माणूस हा संत साहित्याचा केंद्रबिंदू होता. जनमानसाच्या जीवनात समाधान, शांती, सुख मिळण्यासाठी संत साहित्य हे एक प्रभावी साधन होते. संत साहित्यात जन सामनान्सांच्या

समस्या समाधान, ताण तणाव मुक्ती, प्रबोधन, आदींचा समावेश होते. तसेच ते आपल्या समस्याचे उत्तर देखील याच साहित्यातून सापडत असल्याचे दिसून येते. तसेच संताचे प्रमाण वापरत आसल्याचे इतर साहित्यात दिसून येत आहे. तत्वज्ञानामधुन उगम पावलेले मानसशास्त्र 18 व्या शतकात शास्त्रीय स्वरूपात उदयास आले आहे. प्रयोग पध्दतीचा वापर करून त्याने मानवी जीवनात वर्तनाचे निरक्षण, परिक्षण, स्पष्टीकरण आणि नियंत्रण या ध्याने कार्य सुरू केले आहे.

आज मानसशास्त्राच्या अनेक शाखा मानवी जीवनातील समस्या-समाधान, सिध्दांत-तयार करणे, उपयोजीत पध्दतीचा वापर करत असल्याचे दिसुन येत आहे. मानवी वर्तनासंदर्भात आनेक पैलुंचा उलगाडा हा मानसशास्त्राने केला आहे. मानसशास्त्रामुळे मानवी जीवन सुखकर झाले आहे. वर्तनातील कार्य-कारण भाव शोधन्यात मानसशास्त्राला यश मिळाले आहे. मानवी जीवन ज्या मूलभूत मूल्यांनी चालते, तोच संत साहित्याचा विचार आहे.

## संशोधनाचा उद्देश:-

1. संत साहित्य आणि मानसशास्त्र यांच्या मधील दृष्टीकोण अभ्यासणे.

## संशोधनाची गृहितक:-

1. संत साहित्य आणि मानसशास्त्र यांच्या मधील दृष्टीकोणात साम्य दिसुन येते.
2. संत साहित्य आणि मानसशास्त्र यांच्या मधील दृष्टीकोणात साम्य दिसुन येत नाही.

## संशोधन पध्दती:-

सदरील संशोधनासाठी द्वितीय संसाधनाचा वापर करण्यात आला आहे. संताच्या साहित्यात मानसशास्त्रीय दृष्टीकोण तपासण्यात आला आहे. अनेक संतानी आपल्या लेखनातुन मानसशास्त्रीय संकल्पनांचा विचार केला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील संतांचा विचार करण्यात आला आहे. निवडक संत व त्यांच्या साहित्याचा वापर सदरील संशोधनासाठी करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भ साहित्याचा आढावा, पुस्तके, आध्यत्मिक माहिती- मासिक, मानसशास्त्रीय मासिक, वृत्तपत्रे, इत्यांदीचा वापर करण्यात आला आहे.

## संशोधनाचे विश्लेषण:-

भारतात संताची खुप मोठी परंपरा आहे. यामध्ये अनेक संत महाराष्ट्रात झाले आहेत. या संतानी आपले विचार हे अभंग, ओवी, प्रवचन, र्कितन, संबोधन, इत्यादींचा वापर करुन मांडले आहेत. यामध्ये काही संत प्रातिनिधिक साहित्याचा मानसशास्त्रीय विचार खालील प्रमाणे:

**तुकाराम महाराज** आपल्या एका अभंगात- 'अवघा रंग एक झाला' सदरील विधानावरून सकारात्मक मानसिक स्थितीचे वर्णन दिसुन येते. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले.' या अभंगातुन सहानुभूती दाखवली आहे. 'सांगे सुगम मार्ग गजबु गेले' या मधुन दु:खावर मात करण्याचे मार्गदर्शन दिसुन येते. 'आत्मा निवडे तयाचा मार्ग तोचि खरा.' यामधे मनोवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. 'नशीबापेक्षा प्रयत्न मोठा' या अगांत त्यांनी प्रत्यन प्रमाद पध्दती सांगीतली आहे.

**संत ज्ञानेश्वरांनी** 'आता विश्वात्मके देवे' विनम्रता आणि सर्वसमावेशकता यावर आधारीत पसायदान सांगीतले आहे. यामध्ये अध्यामिक, सामाजिक, वैश्विक कल्यानासाठी प्रार्थना केली आहे. 'जेथे जेथे जाई मन, तेथे तेथे तू असशी आपण' म्हणजेच मन ज्याच्याकडे वळते त्या घटकाचा प्रभाव मनावर पडतो. संत ज्ञानेश्वरांचे साहित्यामध्ये सार्थ हरिपाठ, ज्ञानेश्वरांचे अभंग, अमृतानुभव, ज्ञानेश्वरांची विराणी चांगदेव पासष्टी ज्ञानेश्वरांची आरती, सार्थ पसायदान आहे.

**संत एकनाथ महाराज** यांनी क्षमाशीलता, सहनशीलता आणि करूना या मानसिक घटकावर भर दिला आहे. आपल्या भारूडातुन त्यांनी अनेक मानसीक घटकाचा विचार करून त्यावर उपाय देखील सुचवले आहेत. 'यड लागलय, यड लागलय' अशा स्वरूपात प्रखड विचार मांडुन लोकांचे समस्या समाधान, मनोरंजन, मार्गदर्शन करणारे संत होउन गेले आहेत. अनेक भारूडांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक मनाचे परिवर्तन करण्याचे काम केले आहे. माणसातील चित्र, प्रज्ञा बुध्दी अनादी निर्गुणाच्या मायेला कारणीभूत आहे.

**संत रामदास स्वामी** यांचे 'मनाचे श्लोक' यामध्ये मनासंदर्भात मत मांडले आहे. स्वावलंबन, आत्मबळ, कर्तव्य या सारख्या मानसिक संकल्पनावर विचार मांडले आहे. 'केल्याने होत आहे, रे आधी केलेच पाहिजे' यामधुन त्यांनी स्वावलंबन वाढवण्याचे काम केले आहे. आत्मबला संदर्भात 'शरीरापेक्षा मन बलवान असते. मनाने जे ठरवले तेच प्रत्यक्षात येते.' मन सदृढ असेल तर कुठली ही समस्या समाधान होणे शक्य आहे.

संत चोखामेळा यांनी ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा, काय भूललासी वरीलया रंगा. यावरून आसे मत व्यक्त करता की, मनुष्य प्राण्याने फक्त वरच्या रंगाला भूलू नये, फसू नये रंग व आकार या दोन्ही बाहय आवरणाचा भाग आहे. याबरोबरच अंतरंग म्हणजे मुळ गाभ्याची महती लक्षात घेणे महत्वाचे आहे. थोडक्यात यामधून व्यक्तीमत्वाचे स्वरुप दाखवण्याचे काम होत आहे.

वरील अनेक संताच्या साहित्यातुन असे दिसुन येते की, सदरील संशोधनातील गृहितक क्रमांक एक हे मान्य झाले आहे. यानुयार 'संत साहित्य आणि मानसशास्त्र यांच्या मधील दृष्टीकोणात साम्य

दिसुन येते.’ या दोन्ही साहित्यात आभ्यास पध्दती, मांडणी कौशल्य वेगळी असली तरी आशय मात्र एकच आहे असे दिसुन येते.

## संशोधन निष्कर्ष:-

संत साहित्य हे केवळ देव देवांचे गुणगाण सांगणारे नाही तर यामध्ये मानवी जिवनाचे महत्व, जगण्याची कला, ताण तणावाचे व्यवस्थापन, इत्यादी विषयक विवेचन दिसुन येते. आजच्या काळात मानसशास्त्र वापरत असलेल्या संकल्पना फार पुर्वी आपल्या साहित्यात सांगितल्या आहेत. हे सर्व संत त्या काळातील समुपदेशक होते असे म्हणता येईल.

## संदर्भ सुची :-

1. गोसावी र. रा. (2016), *श्री सकल संत गाथा*, पुणे, सारथी प्रकाशन.
2. कानडे एम. डी. व इतर (2015), *ग्रामीण व शहरी लोकांचे उंचावण्यासाठी मानसशास्त्राचे योगदान*, छत्रपती संभाजीनगर, इंद्रायनी ऑफसेट.
3. डॉ. यु. म. पठाण, (2019), *संत साहित्य*, पुणे, सप्तश्री प्रकाशन.
4. डॉ. पवन मांडवकर व इतर, (2015), *संत साहित्य*, भारत संशोधन शोधपत्रीका, ISSN 2349-9370.
5. www.google.com